


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १९९, शुक्रवार १९ एप्रिल २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# शरद पवारांची शुक्रवारी नगरमध्ये सभा

## ■ बाळासाहेब थोरात, आदित्य ठाकरे यांची उपस्थित
## ■ नीलेश लंके यांच्या स्वाभिमान जनसंवाद यात्रेची सांगता

नगर : प्रतिनिधी

**नीलेश लंके यांनी नगर दक्षिण मतदारसंघात काढलेल्या स्वाभिमान जनसंवाद यात्रेची सांगता शुक्रवारी नगरमध्ये होणार असून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेसचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात, युवा सेनेचे प्रमुख आदित्य ठाकरे हे यावेळी उपस्थित राहणार आहेत.**

दि. १ एप्रिल रोजी लंके यांनी पाथर्डी तालुक्यातील मोहटादेवी गडावरून स्वाभिमान जनसंवाद यात्रेस प्रारंभ केला.मतदारसंघातील सर्व तालुक्यांमध्ये जाऊन लंके यांनी नागरीकांशी संवाद साधला. त्या त्या गावांतील समस्या जाणून घेतल्या. यात्रेदरम्यान सर्वच तालुक्यांमध्ये लंके यांच्या या यात्रेस नागरीकांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला.

गेल्या दोन वर्षांपासून लंके यांनी लोकसभा निवडणूकीची तयारी सुरू केली होती. प्रत्येक तालुक्याच्या संपर्कात राहून लंके यांनी गावोगावी पारनेर-नगर मतदारसंघाप्रमाणे तरूणांची फळी उभी केली आहे. ही फळी या यात्रेत अग्रभागी असल्याचे विविध गावांना भेटी दिल्यानंतर जाणवले.

लंके यांच्या संपूर्ण यात्रेदरम्यान त्या त्या तालुक्यातील महाविकास आघाडीचे नेते, कार्यकर्ते पुर्णवेळ सहभागी झाल्याने महाविकास आघाडीच्या एकीचे दर्शन झाले. नागरीकांचा यात्रेस मिळणारा उस्फुर्त प्रतिसाद पाहून महाविकास आघाडीचे नेते, कार्यकर्ते यांचा उत्साह व्दिगुणीत होउन आम्हीच सर्वाधिक मताधिक्य देणार यासाठी तालुक्या-तालुक्यांमध्ये स्पर्धा लागल्याचे चित्रही पहावयास मिळाले.

या सभेसाठी महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरीकांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे, आपचे भरत खाकाळ आदींनी केले आहे.



### कोरोना काळातील कामाला पसंती

कोरोना महामारीमध्ये लंके यांनी जीवावर उदार होउन दोन्ही लाटांमध्ये शरदचंद्र पवार आरोग्य मंदीराच्या माध्यमातून ३३ हजारांहून अधिक रूग्णांना उपचार उपलब्ध करून दिले. देश विदेशात लंके यांच्या या कामाची दखल घेतली. मतदारसंघातीलच नव्हे तर जिल्हयातील, जिल्हयाबाहेरील रूग्णांनाही या आरोग्य मंदीरात उपचार देण्यात आले. तेंव्हापासूनच लंके दक्षिण नगर मतदारसंघातील घराघरापर्यंत पोहचले होते. स्वाभिमान जनसंवाद यात्रेदरम्यान लंके हे गावागावांमध्ये पोहचले त्यावेळी नागरीकांनी कोरोना काळातील लंके यांच्या कामाची दखल घेत त्यांचे हे काम अतुलनीय होते अशा प्रतिक्रीया दिल्या. कोरोना संकटातील काम, विविध व्यक्तीगत कामांमध्ये लंके यांनी केलेली मदत यामुळेच त्यांना मतदारसंघात प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

### लंके यांचे सहकारीही मतदारसंघात

एकीकडे नीलेश लंके यांची स्वाभिमान जनसंवाद यात्रा विविध तालुक्यांमध्ये जाउन लंके हे नागरीकांशी संवाद साधत असताना पारनेर-नगर मतदारसंघातील लंके यांचे विश्वासू सहकारी गेल्या महिनाभरापासून मतदारसंघातील पंचायत समितीच्या गणांतील गावांमध्ये तळ ठोकून आहेत. घरोघर जाउन मतदारांशी ते संवाद साधत आहेत.

### शेतमालाच्या कोसळलेल्या भावामुळे शेतकरी नाराज

केंद्र सरकारने कांद्यावर निर्यात बंदी लादल्याने कांद्याचे दर कोसळले आहेत. इतर शेतमालासही भाव नाही. दुधाचे दरही घसरल्याने शेतकरी वर्गात नाराजी असल्याचे जनसंवाद यात्रेदरम्यान निदर्शनास आले. लंके व इतर वक्त्यांनीही कांदा निर्यात बंदी, दुधाचे कोसळलेले दर याच मुददयांवर भर देत नाराज शेतकरी वर्गाला आपलेसे करण्याचा प्रयत्न केला.

### लंके यांच्या मुक्कामाची चर्चा

या संपूर्ण यात्रेदरम्यान लंके हे घरी गेलेच नाही. ज्या गावात शेवटची सभा असेल तिथेच लंके हे सहकाऱ्यांसह मुक्काम करीत. कधी मंदिरात तर कधी मंगल कार्यालयात लंके यांचे वास्वव्य असायचे. यात्रेदरम्यानच्या लंके यांच्या मुक्कामाची चर्चाही सर्वत्र झडली. या यात्रेची राज्यभरात दखल घेतली गेली.

### अर्ज दाखल करण्यासाठी राहुल गांधी, उध्दव ठाकरे येणार

लोकसभा निवडणूकीसाठी अर्ज दाखल करण्याची तारीख नीलेश लंके यांनी अद्याप निश्चित केली नाही. मात्र अर्ज दाखल करताना काँग्रेसचे राहुल गांधी, शिवसेनेचे उध्दव ठाकरे हे उपस्थित राहणार आहेत. नीलेश लंके यांनीच ही माहीती दिली. राहुल गांधी यांच्याशी गुरूवारी फोनवर चर्चा झाली असून त्यांनी अर्ज दाखल करण्यास येण्याचे मान्य केले आहे. त्यांच्या तसेच उध्दव ठाकरे यांच्या वेळेचे नियोजन करून अर्ज दाखल करण्याची तारीख निश्चित करण्यात येणार असल्याचेही लंके यांनी स्पष्ट केले.

### गांधी मैदानावर सभा

शुक्रवार दि. १९ एप्रिल रोजी सायंकाळी चार वाजता शरद पवार, बाळासाहेब थोरात, आदीत्य ठाकरे यांची सभा नगरच्या गांधी मैदानावर होणार आहे. नीलेश लंके आमदारकीचा राजीनामा देऊन शरदचंद्र पवार यांच्या पक्षात प्रवेश केल्यानंतर लंके, पवार, ठाकरे व थोरात हे प्रथमच एका व्यासपीठावर येणार आहेत. शुक्रवारी होणाऱ्या सभेत पवार, ठाकरे व थोरात काय बोलणार याकडे जिल्हयाचे लक्ष लागले आहे.

### पवार नगरमध्ये तळ ठोकणार

शरद पवार हे सकाळी दहा वाजण्याच्या दरम्यान नगर शहरात पोहचणार असून ते विविध नागरीक, पदाधिकारी यांच्या गाठी भेटी घेणार आहेत. सभेनंतरही पवार यांच्या गाठीभेटींचे सत्र सुरूच राहणार आहे.

# टाकळी ढोकेश्वरच्या तरूणाचा संशयास्पद मृत्यू

## ■ कारमध्ये आढळला मृतदेह
## ■ घातपात की उष्माघात ? चर्चेला उधाण

साकुर, ता. संगमनेर : प्रतिनिधी

**टाकळी ढोकेश्वर येथील व्यवसायिक मनोज गोविंद वाळुंज वय २८ या तरूणाचा संगमनेर तालुक्यातील साकुर येथे कारमध्ये मृतदेह आढळून आला. मनोज याचा मृत्यू उष्माघाताने झाला की घातपात झाला याबाबत तर्क वितर्क लढविले जात आहेत.**





मनोज वाळुंज हा तरूण पारनेर तालुक्यातील पळशी येथील मुळ रहिवासी असून टाकळी ढोकेश्वर येथे नवोदय विद्यालय रस्त्यावर त्याचे स्टेशनरी तसेच हर्बल उत्पादनांचे दुकान आहे. मंगळवार दि. १६ एप्रिल रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास साकुर शिवारात एका कारमध्ये त्याचा मृतदेह आढळून आला. राजेंद्र वामन रा. शेंडेवाडी ता. संगमनेर यांनी खबर दिल्यानंतर घारगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

संगमनेर येथील शासकिय रूग्णालयात मनोज वाळुंज याचे शवविच्छेदन करण्यात आले. मनोज याची पत्नी परदेशात असल्याने ती परतल्यानंतर गुरूवारी मनोज याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

मांडव्यावरून साकुर चौफुल्याकडे जाणाऱ्या उर्वरीत पान ३ वर

# अनिलभैय्या मोबाईल आमदार होते, मी मोबाईल खासदार होणार !

## ■ नीलेश लंके यांचा आत्मविश्वास ■ स्वाभिमान जनसंवाद यात्रा नगरच्या उपनगरांमध्ये



नगर : प्रतिनिधी

**शिवसेना उपनेते, माजी मंत्री स्व. अनिलभैय्या हे नगरकरांचे मोबाईल आमदार होते. मी त्यांच्याच मुशीत तयार झालेला कार्यकर्ता असून त्यांच्याच पावलावर पाउल ठेऊन मी सर्वसामान्य जनतेसाठी काम करतो आहे. अनिलभैय्या मोबाईल आमदार होते तर मी मोबाईल खासदार होणार असल्याचे आत्मविश्वास महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी व्यक्त केला.**

नीलेश लंके यांची स्वाभिमान जनसंवाद यात्रा बुधवारपासून नगर शहरात असून लंके हे नागरीकांशी संवाद साधत आहेत. त्यांच्या समस्या जाणून घेत आहेत. बुधवारी तसेच गुरूवारी लंके यांच्या या जनसंवाद यात्रेस शहर तसेच उपनगरांमध्ये प्रचंड प्रतिसाद मिळाला असून शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी, आप सह माहाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते या यात्रेत उस्फुर्तपणे मोठया संख्येने सहभागी झाल्याने लंके यांनी शहरात मोठया प्रमाणावर शक्तीप्रदर्शन केल्याचे दिसून आले. लंके यांचे ठिकठिकाणी नागरीकांकडून स्वागत करण्यात येत होते.

मी रात्री अपरात्री कधीही तुमच्या सुख-दु:खात सहभागी होईल अशी आपुलकीची साद घालत लंके म्हणाले, अनिल भैयया यांच्या मार्गदर्शनाखाली मी राजकारणाचे धडे गिरवले. राजकारणापेक्षा समाजकारणावर भर देण्याचे संस्कार अनिल भैय्या यांनी माझ्यावर केले. त्यामुळेच मी चोवीस तास सर्वसामान्य नागरीकांमध्येच असतो. त्यांच्या प्रत्येक समस्या सोडविण्यासाठी प्रामणिक प्रयत्न करतो. नगरकरांनी माझ्यावर विश्वास ठेवावा, मी अनिलभैय्या यांना अभिप्रेत उर्वरीत पान ३ वर

# उत्कर्षा रूपवतेंनी सोडली काँग्रेसची साथ; सदस्यत्वाचा राजीनामा

## वंचित आघाडीकडून निवडणूक लढविण्याची शक्यता

शिर्डी: प्रतिनिधी

शिर्डी लोकसभा लढण्याची इच्छा असलेल्या आणि तिकीट न मिळाल्याने नाराज झालेल्या काँग्रेसच्या महासचिव उत्कर्षा रूपवते यांनी काँग्रेसची साथ सोडली असून पक्षाच्या सर्व पदांसह प्राथमिक सदस्यत्वाचा त्यांनी राजीनामा दिला आहे.



शिवसेना ठाकरे गटाकडून भाऊसाहेब वाकचौरे यांच्या उमेदवारीनंतर रूपवते नाराज होत्या. त्याच बरोबर काँग्रेस पक्षाचे अनेक पदाधिकारीही नाराज होते. लवकरच उत्कर्षा रूपवते वंचित बहुजन आघाडीत प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे. रूपवतेंनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिल्याने शिर्डीत काँग्रेसला हा मोठा धक्का मानला जात आहे. उत्कर्षा रूपवतेंनी वंचित बहुजन आघाडीकडून उर्वरीत पान ३ वर

# नगरमध्ये ४२, तर शिर्डीमध्ये ३१ अर्जांची विक्री

## पहिल्या दिवशी एकही उमेदवारी अर्ज दाखल नाही




नगर : प्रतिनिधी

अहमदनगर व शिर्डी या दोन मतदारसंघांसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास आजपासून (गुरुवार) सुरुवात झाली आहे. पहिल्या दिवशी अहमदनगर (नगर दक्षिण) मतदारसंघासाठी २३जणांनी ४२ अर्ज नेले. त्यात महायुतीचे उमेदवार खासदार डॉ. सुजय विखे यांच्या दोन अर्जांचा समावेश आहे.

दरम्यान, शिर्डी मतदारसंघासाठी पहिल्या दिवशी १८ उमेदवारांनी ३१ अर्ज नेले आहेत. दोन्ही ठिकाणाहून आज एकही उमेदवारी अर्ज दाखल झालेला नाही. दि. २५ एप्रिल ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची मुदत आहे.

जिल्ह्यातील दोन्ही मतदारसंघांसाठी येत्या दि. १३ मे रोजी मतदान उर्वरीत पान ३ वर

Sanskar Pratishthan's

DBM English Medium School STATE BOARD

DBM International School CBSE PATTERN

REQUIRED TEACHERS 2024-25



We are looking for **Passionate experienced / Fresher, innovative and qualified teachers** with good communication skills and fluency in English for following Classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No. of Post |
| --- | --- | --- | --- |
| 1 | Pre- Primary | H.S.C./ Graduate/ D.Ted | 5 |
| 2 | Primary | H.S.C./ Graduate/ D.Ted / B.Ed. | 4 |
| 3 | Math's | B.sc/ M.sc/ B.Ed. | 2 |
| 4 | Science | B.sc/ M.Sc. B.Ed. | 2 |
| 5 | STT | B.A./M.A. B.Ed / ( His/ Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A. B.Ed | 1 |
| 7 | Marathi | B.A./M.A. B.Ed | 1 |
| 8 | Hindi | B.A./M.A. B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Computer Knowledge | 1 |

**Walk – in Interview with all original documents On Thursday 25 April 2024, 10.00 AM to 3.00 PM at Above Address**

Note: *Salary commensurate based on Skill, qualification and Experience.
* Bus Facility will be provided.
* Training will be provided to fresher candidate who are passionate about Education.


A/P-Ralegan Siddhi,Tal.Parner,Dist.Ahmednagar
P.H. 7666120168,9422755191,7083758198

निरोगी आरोग्याचा कानमंत्र...

# निरामय

## बुरशीजन्य संसर्ग रोखा!

### आरोग्यावर वाईट परिणाम



**बुरशीजन्य संसर्गामुळे अनेक लोकांच्या नखांवर पिवळसरपणाचा खडबडीतपणा तुम्ही पाहिला असेल. त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे आरोग्याशी खेळणे. ही बुरशी तुमच्या आरोग्यासाठी अतिशय हानीकारक. मेलेनोमा स्किन कॅन्सरचे सगळ्यात खतरनाक रूप आहे...**

एखाद्याची तब्येत बिघडली आणि तो डॉक्टरकडे गेला की डॉक्टरही नखे बघतात. याचे कारण म्हणजे नखांवरून व्यक्तीचे आरोग्य ओळखता येते. डॉक्टरांव्यतिरिक्त, आपण आपली नखे पाहूनदेखील आपल्या आरोग्याबद्दल जाणून घेऊ शकता. वास्तविक, नखे हा शरीराचा एक महत्त्वाचा भाग आहे जो आरोग्याचे रहस्य सांगतो. ज्याची प्रकृती ठीक नसते, त्याच्या नखांमध्ये काही लक्षणे दिसू लागतात. याचा अर्थ असा की नखे तुम्हाला सूचित करत आहेत की तुमच्या शरीरात काहीतरी गडबड आहे आणि लगेच डॉक्टरकडे जाण्याची गरज आहे.

**पिवळी नखे**

जास्त वेळ नेलपॉलिश लावल्यानेही नखं पिवळी पडू शकतात, पण नखांच्या सभोवतालच्या इतर बदलांकडेही लक्ष देणं खूप गरजेचं आहे. नखांभोवतीची त्वचा जर पिवळी असेल तर ते थायरॉईडचे लक्षणही असू शकते. थायरॉईडमुळे नखे जाड, कोरडी, ठिसूळ होऊ शकतात. थायरॉईडमुळे नखे जाड, कोरडी, ठिसूळ होऊ शकतात. अमेरिकन ॲकॅडमी ऑफ डर्मेटोलॉजी असोसिएशनच्या मते, सुजलेली बोटे, अंगभूत नखे ही थायरॉइडची लक्षणे आहेत.

**नखांवर रेषा**

नखांवर रेषा दिसणे हे आरोग्यातील सगळ्यात गंभीर लक्षण आहे. नखांवर दिसणारी रेष हे मेलेनोमाचे संकेत आहेत. नखांच्या खाली होणारा एक प्रकार आहे ज्याला स्किन कॅन्सर असे म्हणतात. हे हाता पायाच्या बोटांमध्ये देखील दिसते. कायम लोकं या सगळ्याकडे दर्लक्ष करतात. पण यामुळे आजूबाजूच्या त्वचेला देखील हानी पोहोचवू शकते.

- खोबरेल तेल लावा : नखांमध्ये बुरशी येण्याचे कारण म्हणजे त्यांची नीट स्वच्छता न करणे. त्यामुळे त्यामध्ये घाण साचते. हे तुमच्या बोटांना झालेल्या दुखापतीमुळे देखील होऊ शकते. जेव्हा जेव्हा तुमच्या नखांमध्ये बुरशी येते तेव्हा त्यापासून आराम मिळण्यासाठी खोबरेल तेल लावा. बुरशीपासून मुक्त होण्यासाठी ही सर्वात प्रभावी कृती आहे.
- एलोवेरा जेल : एलोवेरा जेलमध्ये अँटीफंगल गुणधर्म असतात. अशा स्थितीत ते लावल्याने नखांमध्ये साचलेली घाण आपोआप बाहेर पडू लागते. म्हणूनच ते देखील लागू करा.
- बेकिंग सोडा : या समस्येपासून मुक्त होण्यासाठी तुम्ही बेकिंग सोडा वापरावा. यामुळे नखांमध्ये साचलेली घाण साफ होते. तुम्ही पेस्ट बनवून तुमच्या नखांवर लावू शकता.
- ॲपल व्हिनेगर : ॲपल सायडर व्हिनेगरमध्ये देखील अँटीफंगल गुणधर्म आढळतात, जे फंगल कमी करण्यासाठी चांगले काम करतात. तुम्हाला फक्त व्हिनेगरमध्ये थोडेसे पाणी मिसळून बोटे बुडवून घ्यायची आहेत, यामुळे तुम्हाला बराच आराम मिळेल. जर तुम्हाला तुमच्या नखांना बुरशीजन्य संसर्गापासून वाचवायचे असेल तर त्यांची साफसफाई करत राहा आणि लहान ठेवा. ते खूप मोठे होऊ देऊ नका. त्यामुळे बुरशीची लागण होण्याची शक्यता कमी होते. याचा तुमच्या शरीरावर परिणाम होतो.
- फिंगर क्लबिंग : कॅन्सर रिसर्चनुसार, जवळपास ३५ टक्के जीवघेण्या आजाराने त्रस्त असलेल्या लोकांची नखे अतिशय नरम असतात. नखांच्या बाजूची त्वचा ही सामान्य पेक्षा अधिक वक्र होते. त्याच वेळी, बोटांचे टोक सामान्यपेक्षा मोठे होतात. या अवस्थेला नखे किंवा फिंगर क्लबिंग म्हणतात.

## जमिनीवर बसून जेवण्याचे आरोग्यदायी फायदे...!

**आजकाल आधुनिक लाईफस्टाईलमुळे आपल्या शरीरात अनेक आजारही निर्माण होताना दिसून येत आहेत. गादीवर वा खुर्चीवर बसून जेवणं हे शरीराला घातक ठरतंय असंच दिसून येत आहे. डायनिंग टेबलवर बसून आरामात जेवणं हे शरीराला अधिक नुकसानदायी ठरत आहे. कदाचित जमिनीवर बसून जेवायला अनेकांना लाज वाटत असेल अथवा आपल्या स्टेटसला साजेसे नाही असं वाटत असेल पण जमिनीवर बसून मांडी घालून जेवायला बसण्याचे शरीराला अनेक आरोग्यदायी फायदे मिळतात.**

- जमिनीवर बसून खाण्याचे फायदे : जमिनीवर बैठक मारून जेवणे ही पूर्वपरंपरागत भारतीय पद्धत असून वैज्ञानिकदृष्ट्या ही पद्धत अत्यंत योग्य ठरते. आपण जेवताना मांडी घालून बसतो, ज्याला सुखासन वा पद्मासन म्हटलं जातं. आयुर्वेदात सांगण्यात आल्याप्रमाणे जेवण सुखासन मुद्रेतच करायला हवे. कारण आपण जेवताना वाकून खातो आणि त्यामुळे पोटावर योग्य प्रेशर येतं आणि जेवण उत्तमरित्या पचण्यास मदत होते.
- वजन कमी करण्यासाठी फायदेशीर : उठणे आणि बसण्यामध्ये शरीराची गती ही जलद होते. जमिनीवर बसून जेवल्याने पोट लवकर भरल्यासारखे वाटते आणि प्रमाणापेक्षा जास्त खाल्ले जात नाही. तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर तुम्ही ही पद्धतच स्वीकारावी. मांडी घालून बसण्याने पोटावर ताण येतो आणि पोटाची हालचाल चालू राहाते. तसंच थकवा आणि शरीरातील कमतरता कमी करण्यासाठीही याचा फायदा होतो.



- शरीराच्या पोस्चरमध्ये येते सुधारणा : अन्य योगासनांप्रमाणेच सुखासनात बसल्याने मांसपेशी आणि सांधेदुखीपासून तुम्हाला आराम मिळतो. तसंच शरीराला लवचिकपणा मिळवून देण्यास याची मदत मिळते. तुमची पाठ सरळ राहून पायांना ताकद देण्याचे काम मांडी घालून बसल्यामुळे होते. काही अभ्यासानुसार, जेवताना मांडी घालून बसणे हे शरीरासाठी योग्य पोस्चर मानले जाते.
- पचनक्रिया होते उत्तम : जमिनीवर पाय क्रॉस करून बसल्याने पचनक्रिया अधिक चांगली होण्यास मदत मिळते आणि जमिनीवर ताट ठेऊन खाल्ल्याने शरीर पुढे मागे होत व्यवस्थित व्यायाम होतो. यामुळे अन्न त्वरीत पचण्यास मदत मिळते. मांसपेशी सक्रिय होऊन पोटातील ॲसिडचा स्राव वाढतो आणि अन्नपचन होते.
- शरीराचे स्ट्रेचिंग होते योग्य : जेव्हा आपण डायनिंग टेबलजवळील खुर्चीवर बसून खातो तेव्हा हिप्सचा भाग अधिक टाईट आणि स्ट्राँग होते तर जमिनीवर बसून खाल्ल्याने हिप्सचे फ्लेक्सर्स अगदी सहजपणाने स्ट्रेच करता येतात. तसंच शरीरात अधिक लवचिकता निर्माण होते.
- रक्तप्रवाह होतो जलद : जमिनीवर मांडी घालून बसून जेवल्यानंतर आपल्या शरीरातील रक्तप्रवाह जलद होतो. कारण यामुळे नसा शांत होतात आणि तणाव दूर होतो. जेव्हा आपण बसतो तेव्हा हृदय निरोगी राहते आणि आपल्या शरीरावर आणि हृदयावर कमी दबाव येतो. मांडी घालून बसल्याने रक्तप्रवाह संपूर्ण शरीराला समान स्वरूपात मिळतो. यामुळेच हृदयरोगी व्यक्तींना जमिनीवर बसून जेवण्याचा सल्ला देण्यात येतो.
- कुटुंबाशी जोडून ठेवण्यासाठी महत्त्वाचा दुवा : बसल्याने केवळ शरीरालाच नाही तर मानसिक आणि भावनिक आनंदही मिळतो आणि लाभ होते. कुटुंबासह एकत्र बसून जेवल्याचा आनंद आणि एकमेकांशी गोष्टी शेअर केल्याचा एक वेगळाचा आभास असतो. तसंच मोबाईल आणि टीव्हीपासून दूर असल्यामुळे अधिक आनंद मिळतो.



**कोणताही आजार, शारीरिक कमतरता जाणून घेण्यासाठी डॉक्टरांकडून प्रथम योग्य त्या चाचण्या करण्याचा सल्ला दिला जातो. मात्र याकडे अनेक जण दुर्लक्ष करत असल्याने वेळीच आणि अचूक निदान होण्यास अडथळे निर्माण होतात. तुमच्या आरोग्याविषयी अथवा तुम्हाला होणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांचे जाणून घेत त्यांचे निदान करण्यासाठी तुम्हाला तुमच्या रक्ताचा, मूत्राचा, शरीरातील इतर द्रवपदार्थाचा किंवा शरीराच्या ऊतींचा नमुना घेण्याचा सल्ला दिला जातो. त्यानंतर, आपल्याला काही मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे लागेल. अशावेळी घाबरून न जाता चाचणीसाठी जाण्यापूर्वी काय करावे आणि करू नये याबाबत काही महत्त्वाच्या सूचना...**

## लॅब टेस्ट : हे पाळाच...



**स्क्रिनिंग महत्त्वाचे**

प्रयोगशाळेत केल्या जाणाऱ्या चाचण्या या विशिष्ट रोग किंवा स्थितीचे निदान किंवा तपासणी करण्यात मदत करू शकतात. स्क्रिनिंगमुळे लक्षणे दिसण्यापूर्वीच रोगाविषयी माहिती मिळण्यास मदत होते. इतर चाचण्यांमुळे एखाद्या तज्ज्ञाला एखाद्या आजाराचे निरीक्षण करता येईल किंवा रुग्णावर उपचार चालू आहे की नाही हे पाहावे लागेल. प्रयोगशाळेतील चाचणी देखील एखाद्या अवयव आणि शरीरातील व्याधीबद्दल आवश्यक असलेली माहिती देऊ शकते. परंतु, चाचणीसाठी जाण्यापूर्वी, तुम्हाला काही महत्त्वाच्या टिप्सचे पालन करावे लागेल.

- औषधाबाबत डॉक्टर्सना पूर्ण माहिती द्या : तुम्ही कोणतेही औषध घेत असाल तर डॉक्टरांना न चुकता कळवा. मसाज थेरपी किंवा फिजिओथेरपी नंतर रक्त तपासणी करू नका. आवश्यक जीवनसत्त्वे आणि पूरक आहाराबाबत तुमच्या डॉक्टरांशी चर्चा करा. लॅबमध्ये तपासणीला जाण्यापूर्वी या गोष्टी नक्की पाळा आणि काळजी घ्या. यामुळे तुमची चाचणी योग्य पद्धतीने होऊ शकते.
- शंका विचारून घ्या : तुमच्या डॉक्टरांशी केलेल्या चाचणीबाबत तुमच्या सर्व शंका दूर करण्याचा प्रयत्न करा. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार चाचणीपूर्वी काही ठराविक तासापर्यंत अन्नाचे सेवन न करणे आदींचे पालन करा जेणेकरुन अचूक निदानात मदत होईल.
- काहीही खाऊ नये : वैद्यकीय रक्त तपासणीपूर्वी तुम्ही काहीही खाणे टाळावे. तसेच चाचणीस जाण्यापूर्वी चरबीयुक्त आणि तळलेले अन्नपदार्थ खाणे टाळा तसेच १-२ दिवस आधी अल्कोहोलचे सेवन टाळा. चाचणीपूर्वी धूम्रपान करू नका.
- वेळेत चाचणीसाठी जा : दिवसाच्या वेळेनुसार एन्झाइम आणि संप्रेरक पातळी बदलू शकतात, जोपर्यंत तुमचे डॉक्टर तुम्हाला विशिष्ट वेळी जाण्यास सांगत नाहीत तोपर्यंत सकाळी १० वाजता चाचणीसाठी जाण्याचा प्रयत्न करा.




- तणावमुक्त राहा : कोणत्याही चाचण्या निवडण्यापूर्वी कोणतेही कठोर शारीरिक परिश्रम करू नका आणि तणावमुक्त रहा. चाचणीपूर्व १०-१५ मिनिटे शांत बसणे आणि आराम करणे आवश्यक आहे. शिवाय, चाचणीनंतरही, तुम्हाला पुरेसे पाणी पिण्याची आणि अस्वस्थता निर्माण करणाऱ्या शारीरीक क्रिया करणे टाळा.

## मेंदूला रक्तपुरणाऱ्या धमनीत रक्ताची गुठळी

**मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमी ही प्रक्रिया मेंदूला रक्तपुरवठा करणाऱ्या धमनीतून रक्ताची गुठळी काढून टाकण्यास मदत करेल. या लेखाच्या माध्यमातून या प्रक्रियेबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली आहे.स्ट्रोकच्या रुग्णांना या माहितीचा नक्कीच फायदा होऊ शकेल.**

- स्ट्रोक नक्की कधी येतो? : स्ट्रोक किंवा मेंदूचा झटका जेव्हा तुमच्या मेंदूला रक्तपुरवठा कमी होतो किंवा व्यत्यय येतो तेव्हा होतो. बीफास्ट (बॅलेन्स - संतुलन कमी होणे, आईज- दृष्टी धूसर होणे किंवा कमी होणे, फेस- चेहऱ्याचा काही भाग क्षीण होणे, आर्म- हात कमकुवत होणे, स्पीच- बोलण्यात अडचणी आणि टाईम- वेळ) आणि कोणत्याही गंभीर गुंतागुंतीशिवाय बरे होण्यासाठी स्ट्रोकच्या गोल्डन अव्हरमध्ये उपचार घेणे गरजेचे आहे.
- स्ट्रोकमुळे मृत्यूच्या प्रमाणात वाढ : सध्या देशात स्ट्रोकचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. पक्षाघाताचा झटका सामान्यतः वृद्धांमध्ये दिसून येतो परंतु तरुणांनाही त्याचा त्रास होत असल्याची उदाहरणे समोर येत आहेत. शिवाय, यामुळे जगभरात मृत्यू दर वाढू वाढला आहे. स्ट्रोकमधून बरे होण्यासाठी मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमी उपयुक्त ठरू शकते.
- रुग्णाच्या गतिशीलतेवर परिणाम : ब्रेन स्ट्रोकसारखी आपत्कालीन स्थिती उद्‌भवल्यास, चार-पाच तासांच्या आत आयव्ही थ्रोम्बोलिसिसनंतर मोठ्या धमनीच्या अडथळ्यामध्ये किंवा अलीकडील शस्त्रक्रियेमुळे तसेच विंडो पिरियडच्या नंतरच्या परिस्थितीमुळे टीपीएची निवड करता येत नाही. मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमी हा एक सुरक्षित पर्याय आहे. डॉक्टरांकडूनही या पर्यायाला प्राधान्य दिले जात आहे.
- मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमी सुरक्षित पर्याय : मेंदूला रक्तपुरवठा करणाऱ्या धमन्यांमधील गुठळ्या काढून टाकून मेंदूच्या स्ट्रोकचे व्यवस्थापन करण्यासाठी मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमी हा सर्वात सुरक्षित असा पर्याय आहे. अशा प्रकारे, ही प्रक्रिया तीव्र इस्केमिक स्ट्रोक असलेल्या रुग्णांसाठी उपयुक्त आहे, कारण मेंदूला रक्तपुरवठा आवश्यकतेनुसार होत नाही. फॅट्स किंवा प्लेकमुळे मेंदूतील रक्तवाहिन्या अरुंद होतात.
- सिटी स्कॅन वा MRI ची घ्या मदत : सिटी स्कॅन किंवा एमआरआय स्कॅनसारख्या निदान तंत्रांमुळे धमनीच्या अडथळ्याबद्दल जाणून घेण्यास मदत होऊ शकते आणि त्यानंतरच डॉक्टर हे ठरवू शकतील की रुग्ण मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमीसाठी योग्य आहे की नाही. चांगल्या परिणामांसाठी यांत्रिक थ्रोम्बेक्टॉमी समोरच्या धमन्यांमध्ये स्ट्रोक आल्यानंतर ६ तासांच्या आत आणि मेंदूच्या मागच्या रक्तवाहिन्यांमध्ये १२ तासांपर्यंत केली पाहिजे. काही विशिष्ट परिस्थितींमध्ये ते २४ तासांपर्यंत केले जाऊ शकते. या प्रक्रियेचा अर्थ रिकॅनलायझेशन म्हणतात. यात सामान्य रक्त प्रवाह पुनर्संचयित करणे जे मांडीचा सांधा किंवा मनगटाच्या धमन्यांद्वारे केले जाते.



- शस्त्रक्रियेचा परिणाम होतो तात्काळ : या प्रक्रियेदरम्यान एस्पिरेशन कॅथेटर किंवा स्टेंट रिट्रीव्हर किंवा काहीवेळा दोन्ही अडथळ्यांच्या ठिकाणी प्रगत केले जातात. स्टेंट गुठळ्याच्या पुढे जातो की नाही हे तपासण्यासाठी, गुठळी साफ करते आणि रक्त प्रवाह पुन्हा सुरू होतो का हे तपासण्यासाठी एक्स-रे इमेजिंग वापरली जाते. एखाद्या कुशल तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी रुग्णालये सुसज्ज असावीत. या शस्त्रक्रियेचा परिणाम तात्काळ होतो आणि अनेक रुग्णांना या प्रक्रियेनंतर अपंगत्वाचा सामना करावा लागत नाही.

## काय सांगता... एकातच १० व्यायामांइतके फायदे!

**व्यायाम हा केवळ शरीर तंदुरुस्त ठेवण्यासाठीच नाही तर अनेक घातक आजारांपासून शरीराला दूर ठेवण्यासाठीही आवश्यक आहे. पण प्रत्येक अवयवासाठी जसे की छाती, हात, पाठ, कोर, पाय इत्यादींसाठी वेगवेगळे व्यायाम करावे लागते. जे खूप कंटाळवाणे आणि थकवा आणणारे असते. पण तुम्ही माऊंटन क्लाईंबरबाबत ऐकले आहे का? हा शारीरिक वजनाचा किंवा बॉडीवेट व्यायाम आहे, ज्यासाठी कोणत्याही साधनांची किंवा मशीनची आवश्यकता नसते. तुम्ही ते घरच्या घरी अगदी सहज करू शकता आणि सर्वात मोठी गोष्ट म्हणजे असे केल्याने तुम्हाला १० व्यायामांइतके फायदे एकाचवेळी मिळतात.**



### माऊंटन क्लाईंबर करण्याची पद्धत

सर्वप्रथम प्लँक एक्सरसाईजच्या स्थितीत येऊन आणि हात आणि पायांवर शरीराचा समान भार टाका. लक्षात ठेवा की तुमचे हात खांद्यांच्या समांतर जमिनीवर ठेवलेले असावेत आणि दोन्ही मनगट खांद्याच्या अगदी खालोखाल ठेवावेत. यासोबतच पाठ सरळ, पोटाचे स्नायू घट्ट आणि मान सामान्य स्थितीत असावी. आता शक्य असेल तेवढा उजवा गुडघा छातीच्या दिशेने आणा. हा पाय पुन्हा सुरुवातीच्या स्थितीत घेऊन डावा गुडघा छातीच्या दिशेने आणा. या प्रक्रियेला जास्तीत जास्त वेळ एकदम वेगाने करण्याचा प्रयत्न करा. संपूर्ण व्यायामा दरम्यान श्वासोच्छ्वास व्यवस्थित घेत राहा.

### खूप मजेशीर आहे माऊंटन क्लाईंबर



माऊंटन क्लाईंबर्स हा एक व्यायाम आहे जो कार्डिओ आणि कोर वर्कआउट्स एकत्र करतो. त्यात विविधता आणून स्ट्रेंथ ट्रेनिंगही करता येते. हा व्यायाम करण्यासाठी हात व पाय तुम्हाला जमिनीवरच अशा पद्धतीने हलवावे लागतात जसे की तुम्ही एखाद्या डोंगरावर चढत आहात.

### वयाच्या तिशीनंतर खूप गरजेचं...

या शारीरिक व्यायामाचा परिणाम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर दिसून आला. फिटनेस वाढवण्यासाठी हे अत्यंत फायदेशीर असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे वयाच्या ३० व्या वर्षांपर्यंत स्टॅमिना आणि फिटनेस टिकवण्यासाठी हा व्यायाम रोज करा. तसे, वयाच्या ३० नंतरही ते चालू ठेवले पाहिजे.

### १० एक्सरसाईजचे फायदे एकाचवेळी

हा एक व्यायाम तुम्हाला 10 व्यायामांइतके फायदे एकाचवेळी मिळवून देऊ शकतो. जसे की, स्टॅमिना वाढवतो, वजन कमी होते, पोटाची चरबी निघून जाते, हात मजबूत होतात, खांद्यांची ताकद वाढते, पायाची ताकद वाढते, हृदय चांगले कार्य करते, फुफ्फुसाची ऑक्सिजन वाहून नेण्याची क्षमता वाढते, छातीचे स्नायू वाढतात, क्वॉड्स मसल्स स्ट्राँग बनतात.

## शॉर्ट न्यूज

### महावितरणकडून बेलापूर परिसरात दुरुस्तीची कामे

**बेलापूर :** महावितरणकडून बेलापूर परिसरात ज्या ज्या ठिकाणी उघडे रोहित्र होते, तेथे संरक्षक बॉक्स बसविण्यात येत आहेत. तसेच परिसरातील धोकादायक असणारे वीज जोड शोधून तेथेही दुरुस्ती करण्यात येत आहे. विजेची तार तुटुन सागर भांड याचा मृत्यू झाल्यानंतर बेलापूर महावितरणचे सहायक अभियंता शिरीष वाणी यांनी गावातील धोकादायक असणाऱ्या सर्व रोहित्रांची तातडीने पाहणी करुन सर्व धोकादायक ठिकाणी बॉक्स बसवण्याच्या तातडीने सूचना दिल्या.

### बरखास्ती कारवाईला १५ दिवसांचे संरक्षण

**श्रीरामपूर :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या बरखास्तीच्या कारवाई विरुद्ध उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडून १५ दिवसांचे संरक्षण मिळाले आहे. राहाता येथील सहायक निबंधकांनी संचालक मंडळावर गंभीर आरोप ठेवले होते. पेट्रोल पंपावर टँकर चालकाकडून झालेली भेसळ, मुरुम खरेदी, गाळ्यांचे लिलाव, कर्मचारी पदोन्नती, दिवाळी फराळ वाटप या खर्चावर बोट ठेवण्यात आले होते. निबंधकांनी जिल्हा उपनिबंधकांकडे त्यावर अहवाल सादर केला होता. त्यावरून संचालक मंडळाला बरखास्तीची नोटीस बजावत म्हणणे मागविण्यात आले होते.

### झेंडा मिरवणूकीची २१ वर्षाची परंपरा

**नेवासा :** येथील श्रीराम भक्त शिवा राजगिरे यांची श्रीराम नवमीला काढण्यात येणारी झेंडा व प्रतिमा मिरवणूकीची २१ वर्षाची परंपरा आज ही कायम असून अजून ही ती जपली परंपरा त्यांच्याकडून जपली जात आहे. रामनवमीच्या निमित्ताने झेंडा व प्रतिमा मिरवणुक काढण्यात आली. रामनवमीच्या निमित्ताने बस स्टँड पासून झेंडा मिरवणूकीस प्रारंभ करण्यात आला. शिवा राजगिरे यांनी या झेंडा मिरवणूकीचे नेतृत्व केले. सजविण्यात आलेल्या रथात प्रभू रामचंद्र भगवंताची प्रतिमा दर्शनासाठी ठेवण्यात आली होती. श्रीराम भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### दर्याबाई मंदिरातील दानपेटी पळविली

**पारनेर :** जगप्रसिद्ध लवणस्तंभ असणाऱ्या पारनेर तालुक्यातील वडगाव दर्या येथील दर्याबाई वेल्हाबाई मंदिरातील दानपेटी चोरट्यांनी पळविल्याची घटना घडली. यामध्ये दानपेटीमधील मोठी रक्कम चोरी गेल्याचा अंदाज आहे. जगप्रसिद्ध लवणस्तंभ असणाऱ्या वडगाव दर्या येथे दरीमध्ये दर्याबाई वेल्हाबाई देवीचे मंदिर आहे. दररोज मोठ्या प्रमाणावर भाविक व पर्यटक येथे येत असतात. मंदिरासमोरच दानपेटी आहे. रात्री चार चोरट्यांनी येऊन दानपेटी पळविली. ही दानपेटी दरीमध्ये नेऊन कुलूप तोडून त्यातील रक्कम नेण्यात आली.

### शेततळ्यात पडून दोन भावांचा मृत्यू

**संगमनेर :** तालुक्यातील हिवरगाव पावसा येथे दोन सख्ख्या भावांचा सायकल खेळताना पाय घसरून शेततळ्यात पडल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना बुधवारी (दि. १७) सायंकाळी घडली आहे. हिवरगाव पावसा येथील रितेश सारंगधर पावसे (वय १२) व प्रणव सारंगधर पावसे (वय ८) हे सायकल खेळत असताना एक जण पाय घसरून शेततळ्यात पडला. त्याला वाचवण्यासाठी दुसऱ्या भावाने उडी मारली; परंतु दोघांचाही गाळात अडकून मृत्यू झाला. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

(पान १ वरून)

## टाकळी ढोकेश्वरच्या तरूणाचा संशयास्पद मृत्यू

रस्त्यावरील पेंडभाजे वस्तीजवळ रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एम एच १५ बी एक्स ३४७९ या कारमध्ये मनोज बेशुध्द अवस्थेत आढळून आला. त्याला तातडीने घुलेवाडी येथील ग्रामीण रूग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले असता औषधोपचार सुरू करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे वैद्यकिय अधिकाऱ्यांनी घोषीत केले. मनोज याचा मृत्यू कशामुळे झाला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. शवविच्छेदनाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मनोज याच्या मृत्यूचे कारण पुढे येणार आहे. पुढील तपास हेड कॉन्स्टेबल आर व्ही भुतांबरे हे करीत आहेत.

## अनिलभैय्या मोबाईल आमदार होते, मी मोबाईल खासदार होणार !

असलेले काम करून दाखवेल. तुम्हाला अभिमान वाटावा असे काम करून दाखवेल अशी ग्वाही त्यांनी दिली.

गुरूवारी सकाळी तपोवन रोड येथील मंदिरापासून संवाद यात्रेला प्रारंभ झाला. यात्रेमध्ये लंके यांच्यासह शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर, काँग्रेसचे शहराध्यक्ष किरण काळे, आपचे भरत खाकाळ, युवा सेनेचे विक्रम राठोड, अशोकराव बाबर, संजय शेंडगे, संजय झिंजे, गणेश कवडे, बाळासाहेब बोराटे, परेश लोखंडे, योगीराज गाडे, सुरेश तिवारी, गिरीष जाधव, सचिन शिंदे, शाम नळकांडे, संतोष गेनपा, अंबादास शिंदे, गोविंद मोकाटे, रोहिदास कर्डीले, रघुनाथ झिने, प्रताप गडाख, सुशांत कोकाटे यांच्यासह नगर तालुक्यातील पदाधिकारी, महाविकास आघाडीचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना संभाजी कदम म्हणाले, महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच प्रचार फेरीस ज्याप्रमाणे बुधवारी शहरातील जनतेने उस्फुर्त प्रतिसाद दिला त्याचप्रमाणे गुरूवारीही उपनगांमध्ये मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. लंके यांना उपनगरांमधून जास्तीत जास्त मताधिक्य मिळवून देण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अभिषेक कळमकर म्हणाले, महाविकास आघाडीचे नेते शरद पवार यांनी नगरच्या विकासासाठी योग्य उमेदवाराची निवड केली असून ही निवड आम्ही सर्व एकत्रीतपणे सार्थ ठरवू. लंके यांना खासदार करून दिल्लीला निश्चितपणे पाठवून असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे म्हणाले, लोकसभेच्या निवडणूकीत शहरातील जनता नीलेश लंके यांच्या पाठीशी खंबिरपणे उभी असल्याचे प्रचार फेऱ्यांमधून स्पष्टपणे जाणवले. लंके हे नगर शहरातून मोठे मताधिक्य घेऊन दिल्लीला जाणार आहेत यात शंका नसल्याचे काळे म्हणाले.

तपोवन रोड येथील तपोवन मंदीर येथून रॅलीचा शुभारंभ झाला. प्रभाग क्र. १ ते ७ मधील तपोवन मंदीर, ढवन वस्ती, पवन नगर, वैदूवाडी, श्रमिकनगर, बालाजी मंदिर, वाणीनगर, यशोदा नगर, एकविरा चौक, सिटी प्राईड, शिरसाठ मळा, भगवानबाबा चौक, पारिजात चौक, कलानगर चौक, प्रोफेसर चौक, झोपडी कॅन्टीन, मिस्कीन मळा, महावीर नगर, बोरूडे मळा, भूतकर वाडी, सावेडी गांव, बोल्हेगांव या भागातून रॅली काढण्यात आली. प्रचार फेरीदरम्यान ठिकठिकाणी महिलांनी लंके यांचे औक्षण करीत तर तरूणांनी फटाके वाजवून स्वागत केले.

## उत्कर्षा रूपवतेंनी सोडली काँग्रेसची साथ; सदस्यत्वाचा राजीनामा

**उमेदवारी घेतली तर महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या अडचणी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.**

शिर्डी लोकसभेची जागा काँग्रेस पक्षाला मिळावी अशी मागणी काँग्रेस पदाधिकाऱ्यांची होती. उत्कर्षा रूपवते या काँग्रेसकडून उमेदवारीसाठी आग्रही होत्या. मात्र शिवसेना ठाकरे गटाला जागा सोडल्याने त्या नाराज होत्या. उत्कर्षा रूपवते काँग्रेसच्या राज्य सचिव महिला आयोगाच्या सदस्या आहेत. त्यांच्यासोबत त्यांच्या सहकाऱ्यांनी देखील काँग्रेस पक्षाला रामराम ठोकला आहे. रूपवतेंनी वंचितकडून निवडणूक लढल्यास शिर्डीत तिरंगी लढत होणार आहे.

**पक्ष नेतृत्वावर नाराजी**

रूपवते-चौधरी कुटुंबातील तिसरी पिढी काँग्रेस पक्षात कार्यरत असताना, निस्वार्थपणे अहोरात्र पक्षासाठी झटणाऱ्या माझ्यासारख्या युवा कार्यकर्तीला पक्ष सोडण्याचा निर्णय का घ्यावा लागतो याबद्दल पक्ष नेतृत्वाने विचार करण्याची गरज आहे, असे उत्कर्षा रुपवतेंनी आपल्या राजीनामा पत्रात म्हटले आहे.

**शिर्डी लोकसभेत महाविकास आघाडीचे टेन्शन वाढणार**

काँग्रेस पक्षाने उत्कर्षा रूपवतेंना अनेक पदे दिली असून लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी पक्षाची साथ सोडली आहे. त्यांची वंचितच्या प्रवेशाची शक्यता व्यक्त होत असून त्या महाविकास आघाडीसह महायुतीच्या उमेदवाराची डोकेदुखी वाढवू शकतात. उत्कर्षा रूपवतेंनी जर निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला तर मत विभाजनाचा फटका महाविकास आघाडीच्या उमेदवाराला बसण्याची शक्यता आहे.

## नगरमध्ये ४२, तर शिर्डीमध्ये ३१ अर्जांची विक्री

होणार आहे. त्यासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास आजपासून (गुरुवार) सुरूवात झाली आहे. अहमदनगर मतदारसंघासाठी २३ जणांनी ४२ अर्ज नेले. त्यात खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासाठी अभिजीत दिवटे यांनी दोन अर्ज नेले शिर्डी मतदारसंघाचे कामकाज राहाता येथील प्रशासकीय इमारतीतून पाहिले जात आहे. शिर्डीसाठी पहिल्या दिवशी १८ उमेदवारांनी ३१ अर्ज नेले. पहिल्या दिवशी दोन्ही ठिकाणी एकही उमेदवारी अर्ज दाखल झालेला नाही.

नामनिर्देशन पत्र दाखल करताना सर्वसाधारण प्रवर्गासाठी २५ हजार तर अनुसूचित जाती-जमातीच्या उमेदवारासाठी १२ हजार ५०० रुपये अनामत रक्कम भरावी लागणार आहे. दि. २५ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल स्वीकारल्यानंतर दुस-या दिवशी २६ एप्रिल रोजी छाननी व नामनिर्देशन मागे घेण्याची अंतिम तारीख २९ एप्रिल रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत आहे. दि. २९ एप्रिल रोजी तीन वाजेपर्यंत निवडणूक चिन्हांचे वाटप केले जाईल.

**ऑनलाईन सुविधाही उपलब्ध**

निवडणूक आयोगाच्या ''सुविधा'' या वेब पोर्टलवरही नामनिर्देशन पत्र उपलब्ध आहे. याद्वारे देखील ऑनलाइन पद्धतीने नामनिर्देशन पत्र दाखल करता येतील. अशा प्रकारे सादर केलेल्या ऑनलाईन अर्जाची एक प्रत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे येऊन प्रत्यक्षरित्या सादर करावी लागणार आहे.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2



डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ

- प्रसूती विभाग
  - प्रसूती पूर्व तपासणी
  - संपूर्ण प्रसूती उपचार
  - अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
- गर्भपिशवीचे आजार
  - अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
  - गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
  - गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
- Infertility वंधत्व उपचार
  - वारंवार होणारे गर्भपात,
  - लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
  - पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
  - टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
- स्तनांचे आजार आणि उपचार
- PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
- सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)

पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

## सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
## सहाय्यक निंबधक सहकारी संस्था, पारनेर
## चेडे बिल्डिंग, कॉलेज रोड, पारनेर

Email ID ar.parner@rediffimail.com Ph. (02488) 221568

जा. क्र. २४७९ /सनिपा/वि-२/ धनसंपदापत/क.१०१/सुनावणी / नोटीस / २०२४ दि. १५/०४/२०२४

# जाहीर समन्स

धनसंपदा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. सुपा, ता. पारनेर, जि. अ. नगर या संस्थेने त्यांचे थकबाकीदार/ कर्जदार यांचे विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली दाखला मिळणेबाबतचा प्रस्ताव दि. १८/०३/२०२४ रोजी या कार्यालयास दाखल केलेला असून त्यानुसार या कार्यालयाने कलम १०१ अन्वये दिनांक १८/०३/२०२४ रोजी सुनावणीची नोटीस देवून त्याची सुनावणी दि. ०८/०४/२०२४ रोजी ठेवण्यात आलेली होती. सदर सुनावणीच्या नोटीसा संबंधितांना रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यात आलेल्या होत्या. परंतु सदरच्या नोटीसची बजावणी झालेली नाही किंवा जाब देणार सुनावणीस हजर राहिलेले नाहीत. नैसर्गिक न्याय तत्वाचे दृष्टीने सुनावणीचे जाहीर समन्य दैनिक वर्तमान पत्रात प्रसिद्ध करून त्याची सुनवाणी दिनांक २०/०५/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पारनेर यांचे कार्यालयात ठेवणेत येत आहे. सदर सुनावणीचे दिवशी जाब देणार हे हजार राहिले नाहीत किंवा म्हणणे सादर केले नाही किंवा सदर केलेले म्हणणे समाधानकारक वाटले नाही तर संस्थेने मागणी केलेप्रमाणे कलम १०१ अन्वये वसुली दाखला देणेत येईल याची नोंद घ्यावी.

| अ. नं. | कर्जदार/ जामिनदाराचे नाव व पत्ता | दावा रक्कम | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | १ सालके भाऊ सखाराम<br>पत्ता- मु. पो. जवळा, ता. पारनेर, जि.अ.नगर<br>२ रावडे संगिता देवीदास<br>पत्ता- मु.पो. जवळा, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>३ सालके सत्यवान किसन<br>पत्ता- मु.पो. जवळा, ता. पारनेर, जि. अ.नगर | ११५५ | २९६९०१/- |
| ०२ | १ बेंद्रे गोरख नारायण<br>पत्ता- मु.पो. ता. पारनेर, जि.अ.नगर<br>२ बेंद्रे उत्तम नारायण<br>पत्ता- मु.पो. ता. पारनेर, जि. अहमदनगर<br>३ ठाणगे दादाभाऊ दगडू<br>पत्ता- मु.पो. ता. पारनेर, जि. अ.नगर | ११५६ | २५०९२१/- |
| ०३ | काळे साहेबराव रंगनाथ<br>पत्ता- मु.पो. अरतगाव,ता.पारनेर, जि.अ.नगर<br>२ काळे दादाभाऊ भाऊसाहेब<br>पत्ता- मु.पो. अस्तगाव, ता.पारनेर, जि. अ.नगर<br>३ काळे बाळासाहेब विठ्ठल<br>पत्ता- मु.पो. अस्तगाव ता. पारनेर, जि. अ.नगर | ११४७ | ६३२६७४/- |
| ०४ | १ मुंगसे अशोक जयवंत<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>२ दुधाडे बबन अर्जुन<br>पत्ता- मु.पो. लोणी हवेली, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>३ गाजरे दत्तात्रय त्रिबंक<br>पत्ता- मु.पो. पिंपळनेर, ता. पारनेर, जि.अ.नगर | ११४८ | ५४५६८२/- |
| ०५ | १ रावडे संपत पोपट<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>२ रावडे संजय जयवंत<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि.अ.नगर<br>३ रावडे दादा भाऊ<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि. अ.नगर | ११५१ | ३४७८८६/- |
| ०६ | १ रावडे संगिता देविदास<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>२ नरवडे भाऊसाहेब लक्ष्मण<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>३ करंजुले बाळासाहेब किसन<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि.अ.नगर | ११५२ | १७१०४८/- |
| ०७ | १ मुंगसे सागर पंढरीनाथ<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि.अ.नगर<br>२ मुंगसे पंडित नामदेव<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>३ रावडे देविदस चंद्रभान<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि. अ.नगर | ११५७ | ६६३१४/- |
| ०८ | १ साबळे बापू हरिभाऊ<br>पत्ता- मु.पो. वाळावणे, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>२ साबळे अविनाथ मिठ्ठू<br>पत्ता- मु.पो. वाळावणे, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>३ दरेकर रविंद्र रामदास<br>पत्ता- मु.पो. वाळावणे, ता. पारनेर, जि. अ.नगर | ११४६ | ३२३१२२/- |
| ०९ | १ रावडे उत्तम सर्जेराव<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>२ मुंगसे संतोष रावसाहेब<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि.अ.नगर<br>३ रावडे शरद सर्जेराव<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि. अ.नगर | ११५८ | ८१४१२६/- |
| १० | १ काळे बापू भाऊ<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>२ रावडे शरद सर्जेराव<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>३ काळे दत्तात्रय भाऊसाहेब<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि. अ.नगर | ११५९ | २१०४२५/- |
| ११ | १ रावडे रेखा विजय<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>२ रावडे विजय जयवंत<br>पत्ता. - मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>३ मुंगसे राजेंद्र संपत<br>मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि. अ.नगर | ११६१ | ३१८८७५/- |
| १२ | १ येणारे राजेंद्र बबन<br>पत्ता- मु. पो. रायतळे, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>२ येणारे अर्जुन दिनकर<br>पत्ता- मु. पो. रायतळे, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>३ साबळे अमित विश्वनाथ<br>पत्ता- मु. पो. रायतळे, ता. पारनेर, जि. अ.नगर | ११६२ | १००५५४/- |
| १३ | १ रावडे संपत पोपट<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि.अ.नगर<br>२ रावडे संजय जगवंत<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि.अ.नगर<br>३ रावडे दादा भाऊ<br>पत्ता- मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि.अ.नगर | ११४९ | ८८५९२/- |
| १४ | १ शेख राजू दाऊद<br>पत्ता- मु. पो. सुपा. ता. पारनेर, जि. अ.नगर<br>२ हवलदार हरून गुलाब<br>पत्ता- मु. पो. रायतळे, ता. पारनेर, जि. अ.नगर | ११५३ | ८६०४९/- |
| १५ | १ थोरात नंदकुमार भाऊसाहेब<br>पत्ता- मु.पो. सुपा, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>२ थोरात रवींद्र भाऊसाहेब<br>पत्ता- मु.पो. सुपा, ता. पारनेर, जि. अ.नगर<br>३ ननवरे संदिप सर्जेराव<br>पत्ता- मु.पो. सारोळ सोमवंशी, ता. श्रीगोंदा, जि.अ.नगर | ११५० | १३९२४५/- |

दिनांक - १५/०४/२०२४
ठिकाण - पारनेर

सही/-
(गणेश औटी)
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था
पारनेर, ता. पारनेर

# मांडओहोळ धरणाने गाठला तळ

## दोन महिने पुरेल एवढेच पाणी



कर्जुले हर्या : प्रतिनिधी

**उत्तर पारनेरची जीवनरेखा समजल्या जाणाऱ्या मांडओहोळ धरणाने तळ गाठला. सध्या धरणामध्ये अत्यल्प पाणीसाठा राहिला आहे. धरणाची एकूण पाणी पातळी क्षमता ३९९ दशलक्ष घनफूट असून, आज रोजी धरणात ३७.८४ दशलक्ष घनफूट पाणीसाठा शिल्लक राहिला आहे.**

चालू वर्षी पावसाळ्यात धरणात अवघे ९१.६० दशलक्ष घनफूट पाणी आले होते. अपुऱ्या पावसाने धरण भरले नव्हते. मे महिन्याच्या अखेरीपर्यंत किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत हे पाणी पिण्यासाठी पुरेल, अशी माहिती मांडओहोळ प्रकल्प अभियंता मोरे यांनी दिली. प्रशासनाने खबरदारी म्हणून प्रशासनाने अनेक खासगी उपसा सिंचन योजना बंद केल्या आहेत, तसेच या उपसा सिंचन योजनांचा विद्युत प्रवाह बंद केला आहे. त्यामुळे पाण्याची ही पातळी टिकून आहे. बाष्पीभवन होत असल्याने पाणी साठा कमी होण्याची शक्यता आहे.

### ... तर होईल पाणीटंचाई

**टाकळी ढोकेश्वर, कर्जुले हर्या येथील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना व वासुदे येथील जिल्हा परिषद पाणीपुरवठा योजना यांना या धरणातून पाणीपुरवठा होत आहे, जुलैच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत पाणीपुरवठा करण्याचे प्रशासनाचे नियोजन असल्याची माहिती समजली आहे. मात्र, पाऊस लांबल्यास टाकळी ढोकेश्वर परिसरात पाणीटंचाईचे सावट निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यासाठी प्रशासनाने काळजी घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.**

# एमपीएससी परिक्षेत श्रीकांत झावरे दोन वेळा उत्तीर्ण

## सहाय्यक कक्ष अधिकारी, कर निरीक्षक पदावर नियुक्ती

निघोज : प्रतिनिधी



**निघोज येथील श्रीकांत बाजीराव झावरे हे राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत दोन वेळा उत्तीर्ण झाले असून गेली आठवड्यात त्यांची मुंबई मंत्रालयात सहाय्यक कक्ष अधिकारी पदावर नियुक्ती झाली तसेच गेली दोन दिवसांपूर्वी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल त्यांना उपलब्ध झाला असून यामध्ये त्यांची राज्य कर निरीक्षक पदावर नियुक्ती झाली आहे.**

जिल्हा परिषद शाळा निघोज,मुलिका देवी विद्यालय तसेच पुणे येथे उच्च शिक्षण घेतलेले श्रीकांत हे पहिल्यापासून हुशार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध आहेत. निघोज येथील मुलिका देवी विद्यालयात श्रीकांत यांचे वडील शिक्षक होते. सध्या सेवानिवृत्त वेळेत एक प्रगतीशील शेतकरी म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. श्रीकांत यांच्या मातोश्री संजना झावरे या श्री स्वामी समर्थ सहकारी बँकेच्या संचालिका आहेत. तसेच श्रीकांत यांचे बंधू प्रशांत झावरे हे पुणे येथील नामवंत कंपनीत अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. तसेच त्यांचे मामा देवराम लामखडे हे मुंबई येथे व्यवसायीक असून आई वडील भाऊ मामा, मावशी व काका तसेच मित्र परिवार , नातेवाईक यांचे शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात प पाठबळ मिळाले असल्याची प्रतिक्रिया श्रीकांत झावरे यांनी व्यक्त केली आहे. विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# पिंपरी गवळी येथे वीज पडून दोन बैलांचा मृत्यू

## ■ रुईछत्रपती शिवारात विजेमुळे तिघे गंभीर जखमी ■ सुपा परिसरात अवकाळी पावसाचा तडाखा

सुपा : प्रतिनिधी



**पारनेर तालुक्यातील पिंपरी गवळी येथे वीज पडल्याने दोन बैलाचा जागीच मृत्यू झाला असुन रुईछत्रपती येथे पावसात झाडाखाली आडोशाला बसलेले असताना मोबाईलमुळे तिघा कामगारांच्या जवळून विज गेल्याने तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत.**

याबाबत कामगार तलाठी एस.सी. काते यांनी सांगितले की, बुधवारी दुपारी तीन ते चारच्या दरम्यान पिंपरी गवळी परिसरात वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट चालू असताना पिंपरीगवळी येथील शेतकरी कैलास कुंडलीक मांडगे यांची बैलजोडी शेतात लिंबाच्या झाडाला बांधलेली होती. अचानक वादळ वारा वाढला तसा विजांचा कडकडाटही वाढला तेवढ्यात जोराचा आवाज होऊन पुढे शांतता झाली थोड्या वेळाने त्या विजांच्या कडकडानंतर कैलास मांडगे यांचे दोन्ही बैल मृत झालेले दिसले. काही वेळातच तेथे जनावराचे डॉक्टर ज्ञानेश गुंड तेथे आले व त्यांनी दोन्ही बैल विज पडल्याने मृत झाल्याचे सांगितले. कामगार तलाठी एस. सी.काते यांनी तात्काळ पंचनामा केला असुन याबाबत वरिष्ठांना कळवले आहे.

दुसरी घटना रुईछत्रपती शिवारात घडली तेथे संदीप हरिभाऊ भुताबरे ( वय २४) रा.ढवळपुरी ता. पारनेर, अशोक हेमा पारदे ( वय २५) रा. ढवळपुरी ता. पारनेर व महेश नारायण जाधव( वय २२) रा.चिंचाळे ता. राहुरी तीन शेतमजुर बुधवारी दुपारी वादळ वारा सुटल्याने शेतातील वृक्षाच्या आडोशाला बसले होते. त्यावेळी त्यातील एकाचा फोन चालू होता. वादळ वारा व विजांचा कडकडाट चालू असतानाच या मजुराचाही फोन चालू असल्याने विजेचा प्रवाह जोराचा तेथुन गेला व या तिघांनाही जोराचा झटका बसला तेथील प्रथम दर्शनीने सांगितले की, या तीघांना विजेचा झटका इतका जोरात बसला की पाच दहा मिनिटे त्यांना काही कळाले नाही. त्यांचे हात पाय चोळल्यानंतर ते सावध झाले. त्यातील एकाला छातीला भाजले एकाच्या पायाला भाजले व एकाचे थोडे केस जळाले यावेळी एकाच्या मोबाईलचा स्पोट झाला. रुग्णवाहिका १०८ सह डॉ. विलास काळे व चालक किशोर मडके यांनी तात्काळ या जखमींना नगर येथील सिव्हिलला दाखल केले असुन त्यांची प्रकृती धोक्याच्या बाहेर असल्याचे डॉ. काळे यांनी सांगितले.

# केबल चोरांना पकडण्यासाठी अडीच लाखांचे बक्षीस

## पिंपरी जलसेनच्या शेतकऱ्यांची नामी शक्कल

पिंपरी जलसेन : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील पिंपरी जलसेन येथील शेतकऱ्यांच्या शेती पंपाच्या केबल अज्ञात चोरट्यांनी सोमवारी रात्री चोरून नेल्याची घटना घडली आहे. सुमारे २५ शेतकऱ्यांच्या सुमारे १ हजार फूट केबल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने शेतकरी चोरट्यांच्या भीतीने त्रस्त झाले आहेत. चोरट्यांना पकडुन देण्यासाठी शेतकऱ्यांनी नामी शक्कल लढविली असून केबल चोरांना पकडुन देणाऱ्यांना चक्क अडीच लाख रुपये बक्षीस देणार असल्याचे शेतकऱ्यांनी जाहीर केले आहे.**

गेल्या आठवड्यात सांगवी सूर्यामधील शेतकरी देखील केबल चोरांच्या भीतीने त्रस्त झाले होते. सांगवी सूर्य मधील केबल चोरांचा तपास अद्याप लागला नसून काल मंगळवारी (दि.१६) रात्री पुन्हा सांगवी सूर्या - पिंपरी जलसेन हद्दीवरील वाघदरा (शेळके मळा - कोकनेशेत) परिसरातील सुमारे २५ शेतकऱ्यांच्या जवळपास एक हजार फूट लांबीच्या २५ हजार रूपये किमतीच्या केबल चोरीला गेली आहे. केबल चोरांच्या भीतीने नागरिक त्रस्त झाले आहेत. याबाबत दिनकर थोरात, विठ्ठल शेळके, जयवंत शेळके, बाळासाहेब शेळके, गंगाराम शेळके, जयंत काळे, बाबाजी शेळके आदींनी निघोज पोलीस दुरक्षेत्रात तक्रार दिली असून लवकरात लवकर चोरांना पकडण्याची मागणी केली आहे.

एकीकडे शेतीमालाला भाव नाही, पाण्याची टंचाई भासत असताना चोरट्यांनी केबल चोरून नेल्याने हातातोंडाशी आलेली पिके जळून चालली असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. चोरांना तातडीने पकडण्यात यावे अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

# डॉ. बाबासाहेबांनी देशाला देशा दिली

## रावसाहेब झावरे सर यांचे प्रतिपादन टाकळी ढोकेश्वर येथे डॉ.आंबेडकर जयंती साजरी



टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिशा देण्यासाठी संविधान दिले आज हे संविधान धोक्यात येण्याची चिन्हे आहेत तरी सर्वांनी संविधान टिकले पाहिजे यासाठी प्रयत्न करावे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाचा प्रत्येकाने आदर्श घ्यायला पाहिजेल असे मत रावसाहेब झावरे सर व्यक्त केले.**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ जयंती टाकळी ढोकेश्वर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली . टाकळी ढोकेश्वर येथील बुद्ध विहारामध्ये बौद्ध बांधव तसेच ग्रामस्थ यांच्याकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व गौतम बुद्ध पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तसेच त्यांना अभिवादन करून त्यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळीटाकळी ढोकेश्वर ग्रामस्थ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी टाकळी ढोकेश्वर गावच्या सरपंच अरुणाताई खिलारी, माजी सरपंच सुनीता झावरे, उपसरपंच किरण तराळ, सुनील चव्हाण, रावसाहेब झावरे, प्रदीप खिलारी ,सर ,कुसकर सर , प्रकाश ईघे सर, अंकुश पायमोडे ,विक्रम झावरे, दीपक साळवे, शिवाजी गायकवाड,श्रावण गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य किशोर गायकवाड, परमेश्वर गायकवाड ,मंथन गायकवाड ,योहान गायकवाड, दर्शन गायकवाड, प्रकाश गायकवाड, यांच्यासह बौद्ध बांधव टाकळी ढोकेश्वर तसेच ग्रामस्थ टाकळी ढोकेश्वर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना श्रावण गायकवाड यांनी सांगितले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान ही भारतातील सर्वो च्च संपत्ती आहे. तसेच हे संविधान टिकवण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने प्रयत्न केले पाहिजे व या संविधानाचा आदर राखला पाहिजे .

# रांजणखळगे बाह्यवळण रस्त्यासाठी सहकार्य करणाऱ्या युवा शेतकऱ्यांचा सत्कार

## मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट वतीने कृतज्ञता

निघोज : प्रतिनिधी



**जगप्रसिद्ध रांजणखळगे बाह्यवळण रस्त्यासाठी सहकार्य करणाऱ्या युवा शेतकऱ्यांचा मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट वतीने कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके तसेच ट्रस्टचे सचिव शांताराम कळसकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

आमदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून या बाह्यवळण रस्त्यासाठी ६५ लाख रुपयांचा निधी दोन महिन्यांपूर्वी राज्य सरकारने मंजूर केला होता. ६०० मीटर काँक्रीटीकरण रस्त्याचे काम मळगंगा कन्ट्रक्शनचे अध्यक्ष अमृताशेठ रसाळ व सागर रसाळ यांच्या माध्यमातून दिड महिन्यांपूर्वी सुरू करण्यात आले होते. या बाह्यवळण रस्ता पर्यटक, भावीक तसेच शिरूर येथुन येणाऱ्यांना अतिशय लाभदायक असल्याने हा मार्ग सर्वांनाच सोयीस्कर आहे. रस्त्याचे काम पुर्ण झाल्यानंतर या ठिकाणी पुर्ण रस्त्यावर बारदाणे ( पोती ) टाकण्यात आली जेणेकरून ही पोती पाणी शोषून घेत २४ तास या रस्त्यावर पाणी असेल यासाठी तुषार सिंचन योजना तीन आठवड्यासाठी राबविण्यात आली होती.

पाण्यासाठी निघोज सोसायटीचे संचालक दत्तात्रय लंके हरिश्चंद्र लंके, बाळासाहेब कवाद, जय मल्हार देवस्थान ट्रस्टचे सचिव सचिन लंके व त्यांच्या शेतकरी बांधवांनी मोठ्या प्रमाणात कोणत्याही प्रकारचे पैसे न घेता सहकार्य केले. दिवसभरात ६०० मीटर काँक्रीटीकरण रस्त्यासाठी हजारो लिटर पाण्याचा वापर होत होता जेणेकरून या रस्त्याची वयोमर्यादा २० ते २५ वर्षापेक्षा जास्त होऊ शकते यासाठी मळगंगा कन्ट्रक्शनचे अध्यक्ष अमृताशेठ रसाळ व सागर रसाळ यांनी अतिशय नियोजनबद्ध काम केले असून हा रस्ता पाहाण्यासाठी निघोज व परिसरातील बहुसंख्य लोकांनी भेट देऊन रसाळ यांचे कौतुक केले आहे.

यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त शिवाजीराव वराळ, बबनराव ससाणे, लंके भावकीचे कारभारी गवराम लंके, मळगंगा कंट्रक्शनचे संस्थापक अध्यक्ष अमृताशेठ रसाळ, मुंबई येथील व्यवसायीक मच्छिंद्र लंके ट्रस्टचे व्यवस्थापक महेश ढवळे, उपव्यवस्थापक रोहन उनवणे, बाळासाहेब साळवे आदी उपस्थित होते.

# प्रज्ञाशोध परिक्षेत बाबुर्डी शाळेचे घवघवीत यश

## स्पर्धा परिक्षेतही यशाची परंपरा कायम





सुपा : प्रतिनिधी

**मंथन पब्लिकेशन मार्फत घेण्यात आलेल्या प्रज्ञाशोध परीक्षेत पारनेर तालुक्यातील बाबुर्डी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता दुसरीचा ओम एकनाथ दिवटे १२२ गुण मिळवून केंद्रात दुसरा व राज्यात पंधरावा आला.तर इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी संध्या सचिन निर्वाण हिने २३२ गुण मिळवून केंद्रात दुसरा व राज्यात ३४ वा क्रमांक संपादन केला.**

भूमिका खंडाते २१०गुण, विराज घायाळ २०४ गुण तन्वी दिवटे २१० गुण मिळवून यांनीही यश संपादन केले आहे. त्यांना वर्गशिक्षक संतोष दिवटे व दत्तात्रय मेमाणे,अनिता पवार, कचरू काळे,मुख्याध्यापक राजु ठुबे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. स्पर्धा परीक्षेतील यशाची परंपरा या वर्षीही कायम राखली. स्पर्धा परीक्षा प्रमाणे क्रीडा क्षेत्रातही अंकित निषाद (मोठा गट) व कु.नंदिनी निषाद (लहान गट) यांनी उंच उडी व लांब उडी या क्रिडाप्रकारात जिल्हा परिषद क्रीडा स्पर्धेत जिल्हयात अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावला.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे बाबूर्डी गावचे सरपंच प्रकाश गुंड, उपसरपंच स्वाती जगताप, ग्रामपंचायत सदस्या छाया दिवटे, मनिषा पिसे, ईश्वर दिवटे, सुजाता गवळी, प्रमोद दिवटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जिजाबापु ठुबे, उपाध्यक्ष रमेश दिवटे, अशोक काकडे, राजा छत्रपती ग्रुपचे अध्यक्ष लाला भोंडवे, गणेश दिवटे, रवी गवळी, प्रकाश पिसे, गणेश दिवटे, संदीप गारकर, साहेबराव दिवटे, भाऊ दिवटे, विकास गाडगे ,प्रकाश जगताप, सुनंदा कोल्हे, किशोर लगड, प्रविण दिवटे, सचिन निर्वाण, आदीसह ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे. तसेच गटशिक्षणाधिकारी सीमा राणे, शिक्षण विस्तार अधिकारी के डी ढवळे, केंद्रप्रमुख भिवसेन पवार यांनी कौतुक केले आहे.

# धोकादायक वीज तारांमुळे जीव टांगणीला

## ■ अनर्थ घडण्याची शक्यता ■ त्वरीत दुरुस्ती करण्याची मागणी

निघोज : प्रतिनिधी

**निघोज आणि परिसरातील बहुसंख्य ठिकाणी विजेच्या तारा खाली आल्याने धोकेदायक परिस्थीती निर्माण झाली असून लवकरात लवकर विज मंडळाने दुरुस्ती करावी अशी मागणी तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेशशेठ लाळगे यांनी केली आहे.**

अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीची मुख्य यात्रा दि.१ मे पासून सुरू होत आहे. हा यात्रा महोत्सव तब्बल दहा ते बारा दिवस सुरू असतो यासाठी राज्यातून पाच ते सहा लाख भाविक निघोज येथे येत असतात. देवीची काठी मिरवणूक,श्रींची घागर मिरवणूक,छबिना मिरवणूक,पालखी मिरवणूक अशा अनेक मिरवणूका या निमित्ताने निघत असतात विषेश म्हणजे या सर्व मिरवणूका ज्या मार्गाने जातात त्याच रस्त्यावर विज वाहक तारा खाली आल्या आहेत यासाठी या धोकेदायक तारा येत्या विशिष्ट उंचीवर घेऊन यापासून काही अनर्थ होणार नाही याची काळजी घेण्याची नितांत आवश्यकता असून लवकरात लवकर काम करावे अशी मागणी करण्यात आली आहे.




■ राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या पालखी मार्गावरील मुख्य विजवाहक तारांना झोळ बसत त्या खाली आल्या आहेत यापासून कधीही अनर्थ होऊ शकतो.

तसेच गाव व परिसरातील कुठलाही विज प्रवाह काही तांत्रिक दोषांमुळे खंडीत झाल्यास सर्व गावचा विजपुरवठा तासनतास खंडीत केला जातो ही पद्धत चुकीची असून त्यावर उपाययोजना करण्याची गरज आहे. गावची लोकसंख्या पंचवीस हजाराच्या आसपास आहे. विजयंत्रणा कारभार मोठा आहे. कोट्यावधी रुपयांचा फायदा निघोज सारख्या मोठ्या गावाकडून होत असताना विज कर्मचारी संख्या मात्र अत्यंत कमी आहे. तातडीच्या कामासाठी ईतर गावातील कर्मचारी मदत घ्यावी लागते यातच बराचसा वेळ जात असल्याने यापेक्षा याठिकाणी कर्मचारी संख्या वाढवल्यास खंडीत वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी विलंब लागणार नाही या सर्व सुचनांची लवकरात लवकर अंमलबजावणी करावी अशी मागणी लाळगे यांनी केली आहे.

या मागणीची संबंधित पारनेर येथील अधिकाऱ्यांनी दखल न घेतल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांना संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील सरपंच चित्राताई वराळ पाटील, उपसरपंच माऊली वरखडे तसेच ग्रामपंचायत सदस्य व संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे पदाधिकारी व सदस्य तसेच पारनेर तालुका पत्रकार संघ, राज्य मराठी पत्रकार संघाचे पारनेर तालुका पदाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ भेटणार असल्याची माहिती लाळगे यांनी दिली आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com